माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

**(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)**

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १७१६/२०२२**

| **अपिलार्थी** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. ज्ञानेश्वर कंठीलाल बावनथळे, मु. पिंडकेपार, पो. सुकडी डाक, ता. तिरोडा जि. गोंदिया | सचिव, ग्राम पंचायत, पिंडकेपार, ता. तिरोडा जि. गोंदिया | खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया |

**सुनावणी दिनांक :- १९.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २८.०६.२०२२

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ३०.०६.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : प्रपत्र अ नुसार व ब नुसार कोणतीही कार्यवाही न दिल्यानुसार

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ३१.०३.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०१.०४.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ३० दिवसाचे आत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : दि. १८.१०.२०११ ते दि. २७.०६.२०२१ पर्यंत दुकानगाळे फोडून ताळे तोडून सर्व सामान जाळून फेकून नुकसान प्रकरणी माहिती मागितली आहे.१) दि. १८.१०.२०११ ते दि. ३०.११.२०११, २) दि. २३.०३.२०१३ ते दि. ३०.०५.२०१३, ३) दि.

०४.०१.२०१४ ते दि. ०१.०४.२०१५, ४)दि. १७.०४.२०१५ ते ३०.०४.२०१५, ५)दि. २३.०६.२० ते ०९.०८.२०२१ ६) दि. १०.१२.२०१९ ते दि. २७.०६.२०२१ ७)दि.०१.०४.२००५ पासून ते दि. ०१.१०.२०२१ पर्यत दिलेले किराया भाडे पावती व १००० रु अमानत रक्कम पावती ८) दि. १०.१२.२०१९ ते दि. २७.०६.२०२१ या कालावधीत ग्रा. प चे इराव व दुकान गाळे खाली करणे नोटीस (सुचनापत्र) ची छायांकित प्रत

९) दि. १०.१२.२०१९ ते दि. २७.०६.२०२१ या कालावधीत संरपच/सचिव यांचे समक्ष हक्क सोडून संमती पत्र जर मी लिहून दिले असेल तर त्या संमतीपत्राची व ठरावाची छायांकित.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, पिंडकेपार यांनी दि. ०४.०६.२०२२ रोजी अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती विनामुल्य प्रदान केली.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०९.०५.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०९.०५.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती न मिळाल्याने

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी दि. ०९.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून दि. २२.०६.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जनमाहिती अधिकारी यांनी दोन मुद्यांची माहिती दिली असून उर्वरीत माहिती मिळाली नसल्याचे अपिलकर्ता यांनी सांगितले. त्यानुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास प्रपत्र अ मधील उर्वरीत माहिती ७ दिवसांचे आत देण्याबाबत निर्देश देण्यात आले .

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा** – आज सुनावणीस अपिलार्थी उपस्थित नाहीत. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत पिडकेपार श्री. विलास रामकृष्ण मसराम उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तिरोडा श्री. एस. एम. लिल्हारे उपस्थित आहे. आज सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०४.०६.२०२२ रोजीचे पत्र सादर केली असून, सदर पत्रानुषंगाने अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ ते ६ पर्यंतची माहिती त्यांना प्राप्त झाल्याची पोहच सादर केली आहे. तसेच प्रथम अपिल आदेशात, जनमाहिती अधिकारी यांनी दोन मुद्यांची माहिती दिल्याचे नमूद केले आहे. आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

१. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही संयुक्तिक असून सदर व्दितीय अपिल निकाली काढणे क्रमप्राप्त आहे.

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त निष्कर्षास अधीन राहून अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :१९.१२.२०२४**

जावक क्रमांक --878-------------- दिनांक -------------------------